आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ जानेवारी २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विविध देशांबरोबरच्या व्यापार करारांमुळे तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी मिळणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- १८व्या रोजगार मेळाव्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ६१ हजार उमेदवारांना सरकारी नियुक्तीपत्राचं वाटप

- भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्राची उलाढाल गेल्या दशकभरात १६ लाख कोटी रुपयांवर

- ओदिशाचा नबरंगपूर जिल्हा नक्षलमुक्त घोषित

**आणि**

- जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधे हिमवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

तरुणांना देशात आणि विदेशात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून यासाठी विविध देशांशी व्यापार करार केले जात आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित अठराव्या रोजगार मेळाव्याला ते दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते.  रोजगार मेळाव्याद्वारे आतापर्यंत लाखो युवांना विविध सरकारी विभागांमध्ये नियुक्ती मिळाली असून हे नियुक्तीपत्र तरुणांना विकसित भारताकडे घेऊन जाणारं संकल्पपत्र आहे, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट मोदी - -**

या रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या ६१ हजार जणांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. यात आठ हजार महिलांचा समावेश आहे.  गृह विभाग, वित्त विभाग, महसूल विभाग, आरोग्य विभाग, उच्च शिक्षण विभाग, संरक्षण विभाग आदी विभागात या नियुक्त्या होत आहेत.

गेल्या दहा वर्षांत भारताचं सकल देशांतर्गत उत्पादन दुपटीने वाढलं, जगभरातले शंभरपेक्षा अधिक देश भारतात थेट परकीय गुंतवणूक करत आहेत, त्यामुळे अगणित रोजगार

निर्माण झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. देशात जवळपास दोन लाख नोंदणीकृत स्टार्टअप आहेत, यात २१ लाखापेक्षा जास्त युवा काम करत आहेत, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत नागरिकांची क्रयशक्ती वाढल्याचंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

देशभरात ४५ ठिकाणी हा मेळावा झाला. यात नवी दिल्ली, मुंबई, नागपूर, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, तिरुवनंतरपुरम, भुवनेश्वर आदी शहरांचा समावेश आहे.

रोजगार मेळाव्या अंतर्गत नागपूरच्या सीआरपीएफ ग्रुप सेंटर हिंगणा इथं नवनियुक्त उमेदवारांना नागपूरचे उपमहानिरीक्षक अनिल कुमार यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात आली. पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री  मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप झालं.

**<><><><><>**

गेल्या दशकभरात भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाली असून हा उद्योग १६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्ली  इथं ७४ व्या भारत आंतरराष्ट्रीय वस्त्र मेळयात बोलत होते. वस्त्रोद्योग हा देशातल्या सर्वाधिक रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांपैकी एक झाल्याचं गिरीराज सिंह म्हणाले. अनेक योजनांची अंमलबजावणी केल्यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीतले अनेक अडथळे दूर झाले आहेत, त्यामुळे निर्यातीत देखील वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. अर्जेंटिनाला ७७ टक्के, इजिप्तला ३० टक्के, पोलंड आणि जपानला २० टक्के, स्वीडन आणि फ्रान्सला दहा टक्के निर्यात वाढल्याचं गिरीराज सिंह यांन नमूद केलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय बालिका दिवस आज देशभरात साजरा केला जात आहे. मुलींचे अधिकार, आरोग्य, पोषण आणि कल्याण अबाधित राखत लैंगिक समानता, समान अधिकार तसंच मुलींची सक्षम नागरिक म्हणून ओळख निर्माण होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार व्हायला प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं दरवर्षी २४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ रोजी सुरु केलेल्या ‘बेटी बचाओ- बेटी पढाओ’ योजनेचा वर्धापन दिन म्हणूनही हा दिवस देशभर साजरा केला जात आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या पुढाकारानं २००८ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा केला होता.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यात दुहेरी सामाजिक सुरक्षा आकारणी रद्द करण्यासाठीच्या करारासंदर्भात आज नवी दिल्ली इथं चर्चा झाली. २१ आणि २२ जानेवारी रोजी झालेल्या या चर्चेला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे संयुक्त सचिव पी. एस. गंगाधर आणि यूकेच्या राष्ट्रीय विमा धोरण विभागाचे उपसंचालक एडमंड हेअर उपस्थित होते. या करारामुळे ही दुहेरी आकारणी बंद होईल आणि दोन्ही देशांच्या नागरिकांना फायदा होईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

ओदिशाचा नबरंगपूर जिल्हा आता नक्षलमुक्त झाला आहे. तिथं आणि शेजारच्या छत्तीसगढमधे धमतरी जिल्ह्यात सक्रीय ९ नक्षली अतिरेक्यांनी शरणागती पत्करल्यावर या परिसरातून माओवाद्यांचा बीमोड झाला असल्याचं ओदिशा पोलिसांनी सांगितलं. येत्या ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचं उच्चाटन करण्याच्या केंद्र सरकारच्या उद्दिष्टाप्रति हा महत्त्वाचा टप्पा आहे.

<><><><><>

भारतीय निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बूथ स्तरीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर आणि गैरवर्तन केल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा, गैरवर्तन, आपल्या सूचनांचं जाणूनबुजून पालन न करणं किंवा लोकप्रतिनिधी कायदा आणि मतदार नोंदणी नियमांच्या तरतुदींचं उल्लंघन यासारख्या प्रकरणांमध्ये निलंबनासह कठोर कारवाई केली जाईल, असं आयोगानं मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. गुन्हेगारी स्वरुपाच्या गैरवर्तनाचे प्रकार आढळल्यास एफआयआरही नोंदवला जाऊ शकतो असंही आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता  आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३०वा भाग असेल.

<><><><><>

१६ जानेवारीला रोजी संपलेल्या आठवड्यात भारताच्या परदेशी चलन साठ्यात १४ अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त वाढ होऊन एकूण  चलन साठा ७०१ अब्ज डॉलर्स झाला. परदेशी चलन साठ्याचा मुख घटक असलेली परदेशी चलन मालमत्ता जवळपास १० अब्ज डॉलर्सनी वधारून ५६० अब्ज डॉलर्सच्या वर गेली. युरो, पाऊंड आणि येन या चलनांच्या मूल्यातल्या चढउतारांचा चलन मालमत्तेवर प्रभाव पडल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. सोन्याच्या साठ्यातही साडेचार अब्ज डॉलर्सहून अधिक भर पडली.

<><><><><>

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी वर्षानिमित्त आज आणि उद्या महाराष्ट्रात नांदेड इथं शहीदी सत्संग सोहळयाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातल्या अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अनेक मान्यवर या सोहळयासाठी नांदेड इथं येणार आहेत. या अनुषंगाने आज सकाळी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा ते मोदी मैदान पर्यंत मिरवणूक काढण्यात येणार आहे. काल झालेल्या विशेष कीर्तन सोहळयात ३५० शालेय विद्यार्थ्यांनी एका सुरात श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 'शब्द गुरबानी'चे गायन करून अनोखी स्वरांजली अर्पण केली.

<><><><><>

रणजी क्रिकेट स्पर्धेत पुण्यात महाराष्ट्र विरुद्ध गोवा सुरु असलेल्या सामन्यात आज तिसऱ्या दिवशी गोव्यानं पिछाडीवरून आपल्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रानं आपल्या पहिल्या डावात ३५० धावा करत गोव्यावर १४१ धावांची आघाडी घेतली आहे. सौरभ नवलेनं १०५ धावा करत महाराष्ट्राच्या डावाला आकार दिला. उपाहारापर्यंत गोव्यानं आपल्या दुसऱ्या डावात १ गडी बाद, ४७ धावा केल्या होत्या.

याच स्पर्धेत हैदराबाद इथं मुंबई विरुद्ध हैदराबाद सुरु असलेल्या सामन्यात मुंबईच्या पहिल्या डावातल्या ५६० या मोठ्या धावसंख्येच्या प्रत्युत्तरादाखल आज तिसऱ्या दिवशी

उपाहारापर्यंत हैदराबादनं आपल्या पहिल्या डावात ७ बाद २२६ धावा केल्या होत्या. मुंबईच्या सर्फराज खाननं २२७ तर सिद्धेश लाडनं १०४ धावा केल्या.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात जोरदार हिमवृष्टीमुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी बर्फ साचल्यानं वाहतूक ठप्प झाली आहे तसंच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी पर्यटकांची वाहनं अडकून पडली आहेत तसंच वीजपुरवठाही खंडित झाला आहे. राजधानी शिमला इथं उंचावरच्या भागात काल रात्री पुन्हा जोरदार हिमवृष्टी झाली. चंबा, किन्नौर आणि कुल्लू जिल्ह्यांमधेही सतत हिमवृष्टी होत आहे. येत्या मंगळवारपर्यंत हिमवृष्टी होत राहील असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

उत्तराखंडमधेही उत्तरकाशी जिल्ह्यात हिमवृष्टीमुळे १२ महत्त्वाचे रस्ते बंद झाले आहेत. चौरंगीमधे अडकलेल्या सुमारे २०० जणांना प्रशासनाने सुरक्षितपणे बाहेर काढलं आहे. चारधाम क्षेत्र पूर्णपणे हिमाच्छादित आहे.

जम्मू काश्मीरमधे राष्ट्रीय महामार्ग ४४ सह श्रीनगरमधले प्रमुख रस्ते बंद झाले आहेत. पर्यटकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि या रस्त्यांवरुन प्रवास टाळावा असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**//<><><><><>//**